**प्रकल्प प्रवर्तक मो. अब्दुल कादीर मो. हनिफ, स्टेशन रोड वार्ड नं.३, ता. वणी, जि. यवतमाळ यांच्या प्रस्तावित मे. चिलई डोलोमाईट खाण, चिलई, ता. वणी, जि. यवतमाळ येथे ६१.९१ हेक्टर क्षेत्रात उत्पादन क्षमता १.५ दशलक्ष टन प्रती वर्ष उत्पादनाच्या प्रस्तावाबाबत पर्यारणविषयक जाहिर सुनावणीचे इतिवृत्त**

**दिनांक : १२/०६/२०१९**
**वेळ : सकाळी ११.०० वाजता**
**स्थळ : प्रकल्प स्थळ, चिलई, ता. वणी, जि. यवतमाळ**

**प्रस्तावना:-**

प्रकल्प प्रवर्तक मो. अब्दुल कादीर मो. हनिफ, स्टेशन रोड वार्ड नं.३, ता. वणी, जि. यवतमाळ यांच्या प्रस्तावित मे. चिलई डोलोमाईट खाण, चिलई, ता. वणी, जि. यवतमाळ येथे ६१.९१ हेक्टर क्षेत्रात उत्पादन क्षमता १.५ दशलक्ष टन प्रती वर्ष उत्पादनाच्या प्रस्तावाबाबत प्रकल्पधारकाने पर्यावरण मंजूरीकरिता पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना अर्ज सादर केल्यानंतर प्रकल्पाकरिताच्या पर्यावरण मुल्यांकन तज्ञ समिती (EAC) यांनी त्यांच्या दि. ३१/०७/२०१८ व दि. ०२/०८/२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये सदर प्रस्तावीत प्रकल्पास प्राथमिक मान्यता देऊन दि. १२/११/२०१८ रोजी TOR जारी केले व पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ च्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत जाहीर जनसुनावणीमध्ये उपस्थित झालेले मुद्दे व त्याबाबत प्रकल्पधारकाने दिलेली उत्तरे यांचा सामावेश करून नवीन पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर करण्याचे निर्देश आहेत.

प्रकल्प व्यवस्थापनाने पर्यावरण विषयक जनसुनावणीसाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे उपरोक्त प्रकल्पाकरीता अर्ज केल्यावर मप्रनि मंडळ, चंद्रपूर व जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्या समन्वयाने दि. १२/०६/२०१९ ही तारीख निश्चित करण्यात आली. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदी प्रमाणे सदर जनसुनावणीची जाहीर सुचना, मप्रनि मंडळाने दि. ०७/०५/२०१९ रोजीच्या मराठी दैनिक"लोकसत्ता" व "देशोन्नती" व इंग्रजी दैनिक "द हितवाद" मध्ये प्रसिध्द केली. वृत्तपत्रातील जाहीर सुचनेच्या जाहिरातीद्वारे सर्व संबंधित व्यक्तींना त्यांच्या सुचना, टीकाटिप्पणी, विचार, आक्षेप इत्यादी संबंधित नियामक प्राधिकरण येथे नोंदविण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

या प्रकल्पाबाबत प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत खालील कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनाकरीता/ संबंधितांच्या अभ्यासासाठी उपलब्ध करून देण्यात आली.

१) पर्यावरण विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
२) सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, २ रा व ४ था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - ४०० ०२२
३) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
४) उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५) जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ.
६) जिल्हा परिषद, यवतमाळ.
७) जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ.
८) उप-विभागीय कार्यालय, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
९) उप-विभागीय कार्यालय, केळापूर, ता. केळापूर, जि. यवतमाळ
१०) तहसिल कार्यालय, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
११) तहसिल कार्यालय, झरीजामणी, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ.
१२) पंचायत समिती कार्यालय, वणी, ता. वणी, जि. यवतमाळ.
१३) पंचायत समिती कार्यालय, झरीजामणी, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ
१४) गट-ग्रामपंचायत कार्यालय, चिलई (चिलई व आमलोण), ता. वणी, जि. यवतमाळ.
१५) ग्रामपंचायत कार्यालय, कुंड्रा, ता. वणी, जि. यवतमाळ.
१६) ग्रामपंचायत कार्यालय, तेजापूर, ता. वणी, जि. यवतमाळ.
१७) ग्रामपंचायत कार्यालय, कृष्णानपूर, ता. वणी, जि. यवतमाळ
१८) ग्रामपंचायत कार्यालय, धूनकी, ता. वणी, जि. यवतमाळ.
१९) ग्रामपंचायत कार्यालय, निंबाळा, ता. वणी, जि. यवतमाळ.
२०) ग्रामपंचायत कार्यालय, अडेगांव, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ.

वरील अनुक्रमांक ५ ते २० वर नमूद शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर या जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिद्धी देण्याबाबत कळविण्यात आले होते. अशा तऱ्हेने जाहीर जनसुनावणी बाबत अधिसूचनेमध्ये मध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरूपात प्रसिध्दी देण्यात आली जेणेकरुन प्रकल्प बाधित अथवा संबंधित व्यक्तीना त्यांचे आक्षेप, टिका टिप्पणी, विचार अथवा सुचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल.

जनसुनावणीचे स्थळ प्रकल्प स्थळ, चिलई, ता. वणी, जि. यवतमाळ निवडण्यात आले कारण हे स्थळ प्रकल्पाजवळचे असुन संबंधितांना सोईस्कर असल्याने या ठिकाणी जनसुनावणी ठेवण्यात आली.

पर्यावरण वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार यांच्या दि. १४/०९/२००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकनअधिसूचने नुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत केली.

१) श्री. ललितकुमार वऱ्हाडे, - **अध्यक्ष,**
अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी,
यवतमाळ

२) श्री राजू आर. वसावे, - **सदस्य**
प्रभारी प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, चंद्रपूर

३) श्री प्रताप जगताप, - **समन्वयक**
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ, चंद्रपूर

सदर प्रकल्पाबात प्राप्त झालेल्या तक्रारी, आक्षेप, निवेदन, प्रश्न व जनसुनावणी दरम्यान एकूण उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहीर जनसुनावणी घेण्यासाठी गठीत केलेल्या समितीचा आदेश अनुक्रमे सहपत्र-१ व २ प्रमाणे सोबत जोडलेले आहे.

**जनसुनावणीचे इतिवृत्तः-**

जनसुनावणीच्या सुरुवातीस श्री. प्रताप जगताप, उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, चंद्रपूर यांनी अध्यक्ष व उपस्थित अभ्यगतांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहीती दिली. त्यांनी उपस्थितांना पर्यावरण विषयक,सुचना,विचार,आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली.तसेच त्यांनी हि सुनावणी सर्व संबंधित लोकांसाठी आयोजीत केलेली आहे जेणेकरुन त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न/शंकाचे निरसन करण्यात येईल. तद्नंतर त्यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबत विनंती केली.

जनसुनावणी समितीचे अध्यक्ष तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ यांनी उपस्थित जनसमुदायास मे. चिलई डोलोमाईट खाण, चिलई, ता. वणी, जि. यवतमाळ येथे ६१.९१ हेक्टर क्षेत्रात उत्पादन क्षमता १.५ दशलक्ष टन प्रती वर्ष उत्पादनाच्या प्रस्तावाबाबत आपल्या सुचना, विचार,आक्षेप घेऊन पुढे यावे अथवा त्या लेखी स्वरुपात मांडाव्यात, आपण व्यक्त केलेले मत तसेच सुचना व आक्षेप या अधिसूचनेत नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना कळविण्यात येतील, सदर सुनावणीचे छायाचित्रीकरण व व्हिडीओ शुटींग म.प्र.नि.मंडळाकडुन कायद्यातील तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे, तरी प्रत्येकाने आपले प्रश्न शांतपणे व सनदशिर मार्गाने उपस्थित करावेत व जन सुनावणी शांतपणे पार पाडण्यात सहकार्य करावे असे आवाहन केले.तसेच प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापुर्वी आपले नाव व पत्ता सांगावा जेणे करुन सुनावणीच्या इतिवृत्तांत बनविते वेळी नमुद करण्यात येतील. त्यानंतर त्यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहीती उपस्थितांना देण्यात यावी तसेच त्यांनी प्रकल्पाबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांचे शंकानिरसन करावे अशी विनंती केली.

तद्नंतर प्रकल्पधारकाच्या वतीने कु. अंजली चचाने, पर्यावरण सल्लागार यांनी सदर प्रस्तावित प्रकल्पाबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल मराठी भाषेत सादर केला.सादरीकरणात प्रामुख्याने प्रकल्पाबाबत खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्या.

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहीती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, सिमा, अक्षाश-रेखांश, नकाशा, बुडीत क्षेत्र, लाभ क्षेत्र, वन क्षेत्र, प्रकल्पाचे वैशिष्टय, प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमिन वापर, भुकंप स्थिरता
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधी, शेतकऱ्यांचा प्रकल्पामुळे होणारा विकास
- प्रकल्पाचे विश्लेषण,सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषन
- हवा,पाणी,जमिन,ध्वनी,विस्थापन इत्यादी बाबतची माहीती.
- नियोजीत प्रकल्पांमुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व्यवस्थापन.
- प्रकल्प चालु झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहीती.
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहीती.

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहीती दिल्यानंतर सुनावणीचे आयोजक यांनी असे आवाहन केले की, यानंतर आक्षेप/सुचना/प्रश्न व उत्तरे घेतले जातील. आपणांस विनंती की, सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्यांचे समर्पक उत्तर प्रकल्प धारकाने द्यावे.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पण्या, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे:**

**१) श्री. आशिष वाभितकर, रा. चिलई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ.क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | प्रकल्पाच्या सादरीकरणामध्ये सांगितलेल्या सर्व मुद्यांची पूर्तता करण्यात यावी. हे सर्व मुद्दे फक्त कागदोपत्री राहू नये कारण प्रकल्प सुरू झाल्यावर प्रदूषण होणारच. प्रदूषणाचा विपरीत परिणाम शेती व शेतीनिगडीत व्यवसायांवर होणार आहे व आजू-बाजूच्या परिसरात देखील होणार आहे. खाण सुरू होण्यापूर्वी या सर्व गोष्टींची पूर्तता करण्यात यावी.<br><br>प्रकल्पधारकाने संपूर्ण जमीन विकत घेतलेली | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, या प्रकल्पामध्ये ज्या शेतकऱ्यांची /गावकऱ्यांची जमीन संपादित करण्यात आली आहे त्यांना प्रकल्पात रोजगार त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार प्राधान्याने देण्यात येईल.<br><br>प्रकल्पधारकातर्फे पर्यावरण संवर्धनाच्या सर्व बाबींची पूर्तता करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | नाही. प्रकल्पधारकास विनंती आहे की, त्यांनी उर्वरित जमीन शासनाच्या दरापेक्षा जास्त किंमत देऊन विकत घ्यावी जेणेकरून शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल.<br><br>उत्खनननांतर होणारी मालाची दळणवळण याकरिता प्रकल्प धारकाने रस्त्याचे मजबूतीकरण करावे.<br><br>ज्या शेती मालकाची जमीन प्रकल्पधारकाने संपादित केली आहे त्यांना प्रकल्पधारकाने नौकरीत प्रथम प्राधान्य द्यावे. | प्रकल्पातून निघणाऱ्या मालाची वाहतूक ही दोन रस्त्यांनी करण्यात येणार आहे. पहिला तेजपूर व दुसरा गणेशपूर या दोन्ही रस्त्यांनी करण्यात येईल जेणेकरून वाहतूकीची समस्या निर्माण होणार नाही व रस्त्याची देखील दुर्दशा होणार नाही. तसेच रस्त्याचे मजबूतीकरण देखील करण्यात येईल. |

**२) श्री. राजेश आसुटकर, ग्रामपंचायत आमलोण, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | प्रकल्पामुळे शेतकऱ्यांना जे नूकसान सहन करावे लागणार आहे त्याबाबत त्यांना नूकसान भरपाई व मोबदला देण्यात यावा.<br><br>सदर प्रकल्पामध्ये मौजा चिलई ओमलोण परिसरातील बेराजगारांना जास्तीत जास्त प्रमाणात रोजगार देण्यात यावा.<br><br>सदर खाण प्रकल्पाच्या आजू-बाजूच्या परिसरातील जनतेसाठी आरोग्य सुविधा पूरविण्यात यावी.<br><br>खाण प्रकल्प येत असल्यामुळे चिलई गावात पायाभूत सुविधा पूरविण्यात याव्यात.<br><br>ग्रामपंचायतीमध्ये पाणी शुद्धरकरण यंत्रणा (Water Filter Plant) बसवून देण्यात यावे.<br><br>गावातील रस्त्यांचे बांधकाम करण्यात यावे. तसेच गावातील शेतरस्त्यांचे खडीकरण करण्यात यावे.<br><br>चिलई येथे आध्यात्मिक दृष्टीकोणातून मंदिराचे बांधकाम करून देण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पग्रस्त नागरीकांच्या कुटुंबातील एका व्यक्तिला प्रकल्पात रोजगार देण्यात येईल व त्याचप्रमाणे परिसरातील इतर शिक्षीत व्यक्तिंना देखील त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार प्रकल्पात रोजगार देण्यात येईल.<br><br>प्रकल्पग्रस्त व्यक्तिंना शासनाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणेच मोबदला देण्यात येईल.<br><br>CSR निधीमधून पिण्याचे शुद्ध पाणी, मंदिर उभारणे इ. कामे करण्यात येतील.<br><br>खाणीतून जाण्याऱ्या दोन रस्त्यांप्रमाणे गावातील इतर रस्त्यांचे डांबरीकरण ग्रामपंचायतींकडून प्राप्त प्रस्तावानूसार करण्यात येईल.<br><br>खाणीच्या आजू-बाजूच्या परिसरातील गावांमध्ये नियमितपणे आरोग्य शिबीरांचे आयोजन करण्यात येईल. |

**३) श्री. महादेव नामदेव बोबडे, रा. चिलई, ता. वणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | प्रकल्पधारकास विनंती करण्यात येते की, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना योग्य तो मोबदला देण्यात यावा व मी देखील एक प्रकल्पग्रस्त व्यक्ति असून माझ्या कुटुंबातील एका व्यक्तिस रोजगार देण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पग्रस्त व्यक्तिंना योग्य तो मोबदला शासनाच्या नियमानूसार देण्यात येईल व त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तिस रोजगार देण्यात येईल. |

**४) श्री सुनंदन रेड्डी, पर्यावरणवादी, हैद्राबाद:-**

| अ.क्र. | सूचना |
|---|---|
| १) | प्रकल्पास पाठिंबा असल्याचे सांगितले. |

**५) श्री. पुंडलिक ठावरी, ग्रामपंचायत कुंड्रा, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ:**

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | या परिसरात चिलई डोलोमाईट खाण प्रकल्प आल्याबद्दल गावकऱ्यांचे अभिनंदन. माझे शेती चिलई प्रकल्पालगतच आहे. माझी प्रकल्पधारकास विनंती आहे की, खाण क्षेत्रातील निर्मूलन होणाऱ्या वनसंपदेचे व्यवस्थापन करण्यात यावे. त्याचबरोबर पर्यावरणाच्या नियमांचे शिस्तबध्द पध्दतीने पाळण्यात यावे. प्रकल्पधारकाने जल व वायु प्रदूषणाचे व्यवस्थापन करावे. तसेच प्रकल्प क्षेत्रातील ग्रामपंचायतीप्रमाणे आजू-बाजूच्या परिसरातील बेरोजगारांनादेखील रोजगार देण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पामध्ये नोकरीकरिता १० कि.मी. परिघातील गावांच्या नागरीकांनाच त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनूसार प्रथम प्राधान्य देण्यात यईल. प्रकल्पामुळे वृक्षतोड होणार नाही. प्रकल्पातील ३३ टक्के जागा ही वृक्षारोपणासाठी आरक्षित करण्यात आली आहे. परिसरात औषधी वनस्पती व फळझाडांची लागवड करण्यात येईल. CSR निधीमध्ये आरोग्य शिबीराचा समावेश करण्यात आला आहे. |

**६) श्री. रामदास झिबला लडके, चिलई:-**

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | प्रकल्पधारकातर्फे प्रकल्पग्रस्तांना शासकीय दराप्रमाणे देण्यात येणारी मोबदल्याची रक्कम सांगण्यात यावी. तसेच हा प्रकल्प चिलई गावात होणार आहे किंवा कसे याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. बेरोजगारांना स्थायी | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, प्रकल्पामध्ये ज्या शेतकऱ्यांची जमीन या प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्यात आली आहे त्यांना ₹ ४.६० लक्ष प्रती हेक्टर या दराने मोबदला देण्यात येईल व कुटुंबातील एका व्यक्तिला रोजगार |

| | | |
|---|---|---|
| | रोजगार उपलब्ध होणार आहे किंवा कसे याबाबत देखील स्पष्टीकरण देण्यात यावे. या क्षेत्रात वे.को.लि.च्या खाणी देखील अस्तित्वात आहेत. वे.को.लि. जमील संपादित करीत असताना रू. ८.० लाख किंवा रू. १३.० लाख प्रति एकर प्रमाणे मोबदला देते. प्रकल्पधारक फक्त रू. ४.० लाख प्रति एकर प्रमाणे मोबदला देण्यात येत आहे. याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे. | देण्यात येईल. जर प्रकल्पग्रस्तास या रकमेबाबत काही शंका असल्यास प्रकल्पधारक व प्रकल्पग्रस्त आपापसात विचार विनिमय करून त्याचा तोडगा काढतील. ज्यांची जमीन या प्रकल्पात जाईल अशा व्यक्तिंना ₹३०००/- प्रती महिना भाडे तीन महिन्यांकरिता, ₹५०००/- लंपसम ग्रँट व पुनर्वसनासाठी ₹५०,०००/- व शेतात झाडे असल्यास झाडांकरिता ₹१०,०००/- देण्यात येईल. या प्रकल्पात १९ कुटुंबाची जमीन जाणार आहे व त्यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे कुटुंबातील एका व्यक्तिस स्थायी स्वरूपाचा रोजगार देण्यात येईल. तसेच नागरीकांना कायद्यानूसार रोजंदारी देण्यात येईल. |

**७) श्री. रा. रा. वसावे, प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर :-**

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | प्रकल्पधारकाने श्री. लडके यांना प्रकल्पाचे स्थळ नकाशावर दाखवून द्यावे. तसेच आरोग्य शिबीरे वर्षातून कितीवेळा घेण्यात येणार याबाबत माहिती द्यावी व ग्रामस्थांना याबाबत कसे कळविण्यात येईल याबाबत देखील स्पष्टीकरण द्यावे. तसेच गंभीर स्वरूपाचे आजार लक्षात आल्यास याबाबत काय उपाययोजना करण्यात येतील. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, आरोग्य शिबीर वर्षातून दोनदा राबविण्यात येतील व याबाबत परिसरातील गांवात दवंडी पिटवून माहिती देण्यात येईल. गंभीर स्वरूपाचे आजार आढळल्यास त्यांना आजू-बाजूच्या परिसरातील ग्रामीण रूग्णालय तसेच यवतमाळ येथील शासकीय रूग्णालयात उपचाराची सुविधा पूरविण्यात येईल. |

**८) श्री. दादाजी लडके, चिलई, ता. वणी, जि. यवतमाळ :-**

| अ. क्र. | आक्षेप /सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरून प्रकल्पधारकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १ | प्रकल्पधारकाने घेतलेल्या जमीनीचा मोबदला हा एकरी आहे किंवा हेक्टरी आहे हे स्पष्ट करावे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की, जमीनीची किंमत प्रति एकर प्रमाणे देण्यात येईल. |

**९) श्री. महादेव गेडाम, चिलई, ता. वणी, जि. यवतमाळ :-**

| अ. क्र. | सूचना |
|---|---|
| १ | स्थानिकांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात यावी. |

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समितीचेअध्यक्ष यांनी उपस्थित असलेल्या नागरीकांना आणखी काही प्रश्न/आक्षेप/सूचना असतील तर विचारण्याचे आव्हान केले. मात्र कोणीही तद्नंतर प्रश्न/सूचना/आक्षेप उपस्थित केले नाहीत. त्यानंतर सदस्य पर्यावरण जाहीर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, बैठकीत करण्यातआलेल्यासूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात आली असून त्याचे ईतिवृत्त व रेकॉर्डीग जनतेकरिता प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, पहिला माळा, उद्योग भवन, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर येथे उपलब्ध करून देण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी समिती यांनी बैठकीचा समारोप करताना जनसुनावणीतील उपस्थित झालेल्याबाबींचा आढावा घेऊन उपस्थितांचे आभार मानून जाहीर जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

| | | |
|---|---|---|
| **(प्रताप जगताप)** | **(राजू वसावे)** | **(ललितकुमार वऱ्हाडे)** |
| समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्र. प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, चंद्रपूर | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ |